# जागतिक स्तरावरील संस्कृत

**श्रीकान्त बहुलकर**

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे

संस्कृतविद्येसंबंधी विचार करताना त्या विद्येचा प्राचीन तसेच आधुनिक काळात देशोदेशी झालेला प्रसार लक्षात घेणे आवश्यक आहे, तसेच त्या विद्येचे महत्त्व आणि मर्यादाही समजून घेतल्या पाहिजेत. दुर्दैवाने संस्कृत भाषेचे प्रचारक कधी कधी त्या भाषेच्या अध्ययनास जागतिक स्तरावर जे महत्त्व आहे, त्याची कारणे समजून घेत नाहीत, तसेच तिचे जागतिक स्वरूपही लक्षात घेत नाहीत. त्या भाषेचे महत्त्व सांगताना अतिशयेक्तिपूर्ण विधानेही केली जातात. यासाठी संस्कृत भाषेचे स्वरूप, त्या भाषेतील विविध प्रकारचे वाङ्मय, त्या भाषेस विविध धर्मसंप्रदायांनी दिलेले योगदान अशा विविध गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. तसा विचार केल्यावर संस्कृत विद्येचे खरे स्वरूप आणि तिचे महत्त्व चांगल्या प्रकारे कळू शकेल.

संस्कृत भाषेची पूर्वपीठिका किमान पाच हजार वर्षे जुनी आहे. वेदकाळातील भाषा ही बोली भाषा होती. पाणिनी या व्याकरणकाराने अडीच हजार वर्षांपूर्वी त्या भाषेचे जे व्याकरण रचले, ते जगातील एक सर्वोत्तम व्याकरण गणले जाते. त्या व्याकरणाने संस्कृत भाषेला नियमबद्ध केले, त्यामुळे गेली हजार वर्षे संस्कृत भाषा त्या व्याकरणाच्या नियमांनुसार बोलली जाते आणि लिहिली जाते. त्या शुद्ध भाषेलाच संस्कृत असे नाव दिले गेले. इतर भाषांना प्राकृत म्हणतात. पाणिनीच्या संप्रदायातील आचार्यांनी त्या भाषेच्या शुद्धीला अतिशय महत्त्व दिले. पाणिनीनंतर इतरही आचार्यांनी संस्कृत भाषेची व्याकरणे रचली, पण त्यांची जवळ जवळ उपेक्षाच झाली.

वैदिक परंपरेच्या अनुयायांबरोबरच इतर संप्रदायाच्या विद्वानांनीही संस्कृत भाषेत रचना करून मोठे योगदान दिले आहे. तथापि यासंबंधीची माहिती फारशी सांगितली जात नाही. ते योगदान पाहिल्यास संस्कृत भाषा ही कोणत्याही विशिष्ट संप्रदायाची किंवा परंपरेची मक्तेदारी नव्हती, ही गोष्ट ध्यानात येते. संस्कृत भाषेत रचना करताना पाणिनीच्या व्याकरणाचा विचार नेहमी केला गेला नाही. कित्येक वेळातर

त्या नियमांविरुद्ध बंडही केले गेले. त्या वेगळ्या प्रकारच्या भाषा हेही एक वास्तव आहे आणि त्या वास्तवाचाही विचार केला पाहिजे. संस्कृत भाषेतील ग्रंथांचे चिनी, तिबेटी, मोंगालियन, खोतानी अशा अनेक भाषांमध्ये प्राचीन काळात अनुवाद झाले. अनेक हस्तलिखिते इतर देशांमध्ये गेली, त्यांचाही अभ्यास तेथे झाला. भारतीय संस्कृतीच्या प्रसाराबरोबरच संस्कृत विद्येचीही प्रसार झाला. विदेशी पंडितांनीही त्या भाषेस मोठे योगदान दिले.

गेल्या तीनेकशे वर्षांमध्ये पाश्चात्य जगाचे लक्ष संस्कृत विद्येकडे गेले आणि त्या विद्येच्या अभ्यासाला मोठी चालना मिळाली. संस्कृत भाषेबरोबरच पाली आणि प्राकृत भाषांचा तसेच बौद्ध आणि जैन धर्मांचाही अभ्यास होऊ लागला. अफगाणिस्तानापासून जपानपर्यंत देशोदेशी असलेली हस्तलिखिते हा अभ्यासाचा मोठा विषय बनला. गेल्या शंभर वर्षांमध्ये भारतीय इतिहासाची  अनेक साधने त्या देशांमध्ये उपलब्ध झाली आहेत. तथापि याबद्दलची फारशी माहिती संस्कृतच्या भारतीय अभ्यासकांनाही नाही.

संस्कृत विद्येचा विचार करताना अशा प्रकारे त्या विद्येचे जागतिक स्वरूप लक्षात घेणे गरजेचे आहे.

*****